# दीक्षा

तृषार्त होता पयोनिधी झाला
क्षुधार्त होता दद्योधन झाला
अस्वस्थ होता तू औषधी झाला
मार्गस्थ होता साथीदार झाला

हाकेला माझ्या साद नित्य दिली
हाताला माझ्या बळकटी दिली
कायेला थकता उभारी दिली
मनाला आशेची झळाळी दिली

गुरुराया ज्ञानाची शिदोरी दिली
पडशी पाठीला भक्तीची दिली
दीक्षा भूतमात्री प्रेमाची दिली
मुक्तीची सुलभ वाट दाविली

– नारायण
०९/२०/२३